# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/12/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## लघुदाब वाहिनीतील ॲल्युमिनीअम तार चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत १३ किमी अंतरावर मौजा उमरी परसाड येथे दिनांक २०/१२/२०२३ चे २३.१० वा. ते दिनांक २१/१२/२०२३ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– शेषराव निलकंठ तितरमारे, वय ३८ वर्ष, रा. वडोदा ता. कामठी हा आपले कार्यालयात काम करित असताना फिर्यादीला फोनद्वारे माहिती मिळाली कि, मौजा पलसाड उमरी रोड शिवारातील कृषी पंपांना विज पुरवठा करणारे लघुदाब वाहीनीचे १५ ईलेक्ट्रीक पोल वरील ॲल्युमीनिअम तार कोणीतरी अज्ञात चोराने कापुन चोरून नेले आहे. सदर लघुदाब वाहिनीतील **२ कि.मी तार किंमती ५५,०००/–रुपयाचा मुद्देमाल** कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार यंगलवार मो.क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

## लघुदाब वाहिनीतील ॲल्युमिनीअम तार चोरी

पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा गूमगाव शिवार येथे यातील फिर्यादी नामे– अंजली गुनसागर गायकवाड, वय ३० वर्ष, रा. मानकापुर नागपुर प्लॉट नं. ०८ ह. मु. नविन वस्ती खापा सहायक अभियंता महावितरण खापा यास दि. २०/१२/२०२३ रोजी ११/१५ वा. सुमारास गौतम सोमकुवर यांचा फोन आला त्यांनी सांगीतले की कोणत्यातरी अज्ञात चोराने सौ. मंदाबाई बसोले व श्री. डोमा खडसे याचे शेताजवळील महावितरण कंपनीचे खापा ग्रामीण विज वितरण केंद्र यांचे ३०० मीटर लघुदाब वाहीनी ॲल्यूमीनीयम तार किंमती ३००००/–रू. चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नारायण बोरकर पोस्टे खापा हे करीत आहे.

## पळवून नेवून विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. मौदा :– दिनांक १८/१२/२०२३ चे १०.३० वा. ते १७.०० वा. दरम्यान फिर्यादी हि अल्पवयीन असुन ईयत्ता १० वी ला आहे नेहमी प्रमाणे फिर्यादी हि शाळेत पायी जात असतांना यातील **आरोपी नामे– शाम प्रकाश शेंडे, वय २८ वर्ष, रा. आडका ता. कामठी. जिल्हा नागपूर** याने फिर्यादीस जबरदस्तीने व धमकावुन आपले मोटार सायकलवर बसवुन फिरायला नेले व तिचा विनयभंग केला व घरी कोणाला सांगितल्यास जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३, ३५४(D), ५०६ भादंवी सहकलम ८, १२ बाल लैंगिक अपराध संरक्षण अधिनियम सहकलम 3(1)( r), 3(1)(w)(i),3(1)(w)(ii),3(2)(va) अनुसुचित जाती अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधि. १९८९ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग कार्यालय कन्हान श्री. पुंडलिक भटकर सा. हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**